ठेवीवरील आकर्षक व्याजदर
व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव ४%
बिंदूसागर (दैनंदिन ठेव) ४%
अल्पमुदत ठेव
४६ दिवस ८.००%
९० दिवस ८.२५%
१८० दिवस ९.००%
मुदत ठेव
१ वर्ष पुढे ९.५०%
२ वर्ष पुढे ९.५०%
३ वर्ष पुढे ९.५०%
दामदुप्पट ठेव :- ९० महिने
आजची मुदत ठेव उद्याचे भविष्य...
इंद्रायणी महिला ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था मर्या.भाळवणी
मुख्य कार्या: भाळवणी बस स्टँड
शाखा: ढवळपुरी,गोरेगाव,सुपा,टाकळी ढोकेश्वर,अ.नगर
अधिक माहितीसाठी संपर्क : 9423059405 9763484973

# पारनेर दर्शन

भारत सरकार मान्यताप्राप्त,
हॉलमार्क प्रमाणित दागिण्यांचे दालन.
धरमचंद भवरीलाल™
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
मेन बाजार पेठ (आडत बाजार), बस स्टँड जवळ, नगर अर्बन को-ऑप.बँकशेजारी, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे.
(02138) 22 45 45 w.w.w.facebook.com/dbjweller

वर्ष १ अंक १३६, बुधवार ७ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू करा

## आ. नीलेश लंके यांचे अजित पवारांना साकडे



■ ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू करण्याच्या मागणीचे निवेदन आ. नीलेश लंके यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना दिले.

### लक्षवेधी मांडा

**पारनेर-नगर मतदारसंघाचे विधानसभा सदस्य या नात्याने आ. नीलेश लंके यांनी विधानसभेत लक्षवेधी सुचना मांडून ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू करण्याची मागणी करावी अशा मागणीचे निवेदन पारनेर वकील संघाच्या वतीने आ. नीलेश लंके यांना देण्यात आले.**

मुंबई : विशेष प्रतिनिधी

**नगर जिल्हयातील राहुरी येथील ॲड. राजाराम आढाव व ॲड. मनिषा आढाव या वकील दाम्पत्याच्या निर्घुण हत्येच्या पार्श्वभूमीवर राज्यात ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट लागू करण्याची मागणी आमदार नीलेश लंके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**

आ. लंके यांनी पारनेर शहरातील वकीलांसह मंगळवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेत त्यांना निवेदन सादर केले. निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, आढाव दाम्पत्याच्या हत्येच्या खटल्यामध्ये विशेष सरकारी वकील म्हणून ॲड. उज्वल निकम यांनी नेमणूक करण्यात यावी. आढाव दाम्पत्याच्या हत्येमुळे महाराष्ट्रातील वकील वर्ग हादरून गेला असून या घटनेनंतर दि. २९ जानेवारी पासून ३ फेब्रुवारी पर्यंत पारनेर वकील संघाने केलेल्या ठरावानुसार न्यायालयाचे कामकाज बंद ठेवण्यात आले होते. दि.५ फेबुवारी रोजी बैठक घेण्यात येऊन दि.९ फेब्रुवारी पर्यंत कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय वकील बांधवांनी घेतला आहे.

महाराष्ट्र राज्यातील वकील बांधवांवरील हल्ले दिवसेंदिवस वाढत चालले आहेत ही बाब संपूर्ण न्याय व्यवस्थेसाठी खुप चिंताजनक आहे.वकीलांनी निर्भयपणे काम करण्यासाठी निर्भय वातावरणाची गरज असते. ते निर्माण करून देण्याची जबाबदारी आपल्या शासनाची आहे. इतर काही राज्यांमध्ये हा कायदा लागू करण्यात आला असल्याचे नमुद करून बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र अॅण्ड गोवा यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाकडे ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्टचा मसुदा सहा महिन्यांपूर्वीच सादर करण्यात आला आहे. वकीलांवर वारंवार होणारे हल्ले लक्षात घेता वकील संरक्षण कायदा लागू होणे अत्यंत महत्वाचे असल्याचे लंके यांनी आपल्या निवेदनात नमुद केले आहे.
यावेळी पारनेर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. टी. बी.उबाळे, ॲड.बी.ई.तराळ, सचिव ॲड. ए.पी.औटी तसेच ॲड. गणेश औटी हे उपस्थित होते.

# पतसंस्थांमधील एक लाख रूपयांपर्यंतच्या ठेवींना संरक्षण

■ राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय ■ मा. आ. विजयराव औटी यांच्या पाठपुराव्यास यश ■ ३ कोटी ठेवीदारांना लाभ मिळणार

मुंबई : प्रतिनिधी

**सहकारी पतसंस्थांच्या ठेवीदारांमध्ये विश्वासार्हता वाढविण्यासाठी १ लाख रूपयांपर्यंतच्या ठेवी संरक्षित करण्यासाठी स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी योजना सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या योजनेसाठी परतफेडीच्या अटीवर नियामक मंडळास १०० कोटी इतका निधी देण्यात येणार आहे.**



■ पतसंस्थांमधील ठेवींना संरक्षण देण्याच्या मागणीसाठी विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांनी अलिकडेच सहकार आयुक्त अनिल कवडे यांची भेट घेऊन चर्चा केली होती.

### औटी यांच्या पाठपुराव्यास यश

**पतसंस्थांमधील एक लाख रूपयांपर्यंतच्या ठेवींना संरक्षण मिळावे यासाठी विधानसभेचे माजी उपाध्यक्ष मा. आ. विजयराव औटी यांनी अलिकडेच सहकार आयुक्त अनिल कवडे यांची भेट घेऊन ठेवींच्या संरक्षणासाठी पावले उचलण्याची मागणी केली होती. राज्य शासनाच्या निर्णयामुळे त्यांच्या या पाठपुराव्यास यश आले आहे.**

राज्यात सुमारे वीस हजार नागरी, ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. या पतसंस्थांकडे सुमारे ३ कोटी ठेवीदारांच्या सुमारे ९० हजार कोटी रूपयांच्या ठेवी आहेत. या ठेवींना संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने सहकार कायद्यातील कलम १४४-२५ अ मध्ये स्थिरीकरण व तरतला सहाय्य निधी निर्माण करण्याची तरतुद आहे. त्यानुसार राज्यातील पतसंस्थांनी या निधीमध्ये अंशदान जमा करावयाचे आहे. हा निधी सहकार आयुक्त व निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या नियामक मंडळाच्या स्तरावर जमा करण्यात येणार आहे.

निधी जमा करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक यांनी शासनास सादर केलेल्या योजेनेनुसार पतसंस्थांकडून प्रतिवर्षी रु.१०० ठेवींसाठी १० पैसे अंशदान जमा होणे अपेक्षित आहे. या योजनेनुसार अवसायनात जाणाऱ्या पतसंस्थांच्या ठेवीदारांना १ लाख मर्यादेपर्यंतच्या ठेवींसाठी संरक्षण मिळणार आहे.

या निर्णयाचा राज्यातील नागरीक, ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या सुमारे तीन कोटी ठेवीदारांना लाभ मिळणार आहे. सहकारी पतसंस्थांबाबत विश्वासार्हता वाढविण्यासाठी या योजनेमुळे मदत होणार आहे. या निर्णयामुळे सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना त्यांची चेअरमन, व्हाईस चेअरमन पदावर निवड झाल्यापासून संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळेल. त्यामुळे संस्थेच्या दैनंदिन कामकाजात व व्यवस्थापनात स्थैर्य येण्यास मदत होणार आहे.

# राजे शिवाजी पतसंस्थेवर अखेर प्रशासकराज

## राहात्याचे सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडकर यांची नियुक्ती

पारनेर : प्रतिनिधी

**कान्हूर पठार येथील राजे शिवाजी पतसंस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा निबंधक गणेश पुरी यांनी राहात्याचे सहाय्यक निबंधक रावसाहेब खेडकर यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.**



राजे शिवाजी पतसंस्थेच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाल्यानंतर १४ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. अर्ज मागे घेण्याच्य दिवशी आठ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने १३ जागांसाठी केवळ सहा अर्ज शिल्लक राहिले. गणपुर्ती होत नसल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक गणेश औटी यांनी संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्याची शिफारस सहकार विभागाकडे केली होती. त्यानुसार संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. लवकरच खेडकर हे प्रशासकाची सुत्रे हाती घेणार आहेत.

# सावेडीत व्यापारी संकुलाला भीषण आग

## खासगी फायनान्स कंपनीचे कार्यालय भस्मसात सुदैवाने जीवित हानी नाही

नगर : प्रतिनिधी

**नगर-मनमाड रस्त्यावरील सावेडी परिसरात असलेल्या साई मिडास या व्यापारी संकुलाच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात भीषण आग लागून हे कार्यालय भस्मसात झाले. आज, (मंगळवारी) सकाळी नऊच्या सुमारास घडलेल्या या घटनेत सुदैवाने जीवित हानी झाली नाही. मनपा अग्निशमन दलाच्या बंबाने आग नियंत्रणात आणली. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही.**



या व्यापारी संकुलाच्या दुसऱ्या मजल्यावर एचडीबी फायनान्स कंपनीचे कार्यालय आहे. आज (मंगळवारी) सकाळी साडेआठच्या सुमारास एचडीबी फायनान्स कंपनीच्या कार्यालयाला आग लागून थोड्याच वेळात आगीने रौद्र रूप धारण केले. आगीची झळ बेसमेंटला असलेले कपड्याचे दुकान व पहिल्या मजल्यावर उर्वरीत पान ३ वर

TENDER NOTICE

"Education through self-help is our motto" Founder : Karmaveer Bhaurao Patil

The Princopal , Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar. .Invite E-tender for Construction of Temporary rooms job through the website of MKCL, https://www.edumart.sets.co.in

| Name of the work | Estimated cost in (Rs.) | Start Date | Last Date |
| --- | --- | --- | --- |
| Construction of Temporary rooms for Rayat Shikshan sanstha's Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar. | 17,90,865/- | 30/01/2024 | 15/02/2024 |

The Principal
Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar.
Contact no. :- 8485057025

# घोडनदी पात्रात वाळू तस्करांचा रात्रीस खेळ चाले !

■ गौणखनिजाचे मोठया प्रमाणात उत्खनन
■ महसूल व पोलीस प्रशासनाची बघ्याची भूमिका
■ कोहकडी फाटा, कुरूंद हद्दीतून अवैध वाहतूक

कोहकडी : विशेष प्रतिनिधी

**एकीकडे महसूल मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी गौण खनिजाचे अवैध उत्खनन व त्याच्या वाहतूकीवर कठोर निर्बंध लादलेले असताना दुसरीकडे त्यांच्याच जिल्हयात पारनेर तालुक्यातील कोहकडी फाटा व कुरूंद हद्दीमधील घोडनदी पात्रातून मोठया प्रमाणावर गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन करून वाहतूक करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी तस्कर हे उद्योग करीत असून महसूल विभागाने झोपेचे सोंग घेत या अवैध उत्खननास जणू मुक संमतीच दिल्याचे बोलले जात आहे.**



नगर व पुणे जिल्हयाच्या हद्दीवर असलेल्या पारनेर व शिरूर तालुक्याच्या हद्दीत नेहमीच अवैध गौण खनिज उत्खनन सुरू असल्याचे पहावयास मिळते. महसूल मंत्र्यांनी गौण खनिज उत्खननावर काठोर निर्बंध लादलेले असतानाही घोडनदी पात्रात मात्र वाळू, माती तसेच मुरूमाचे मोठया प्रमाणावर उत्खनन करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळी यांत्रीक उपकरणांच्या मदतीने हजारो ब्रास गौण खनिजाची चोरी करण्यात येत आहे.
उत्खनन करण्यात येत असल्याने नदीच्या पात्रामध्ये मोठ मोठे खडडे पडले असून पात्र मोठे होऊन नदीचे पाणी शेतांमध्ये शिरले आहे. नगर -पुणे महामार्गापासून काही अंतरवर ही तस्करी होत असताना पारनेर व शिरूर तालुक्यातील महसूल व पोलीस प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत एक प्रकारे तस्करांना अभय देत आहे. उर्वरीत पान ३ वर

Hero जागा भरणे आहेत
वर्कशॉप सुपरवायझर (ऑटो डीप्लोमा) : 2 जागा
स्पेअरपार्ट एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 1 जागा
वॉशिंग बॉय (10 वी पास) : 2 जागा
मेकॅनिक (आयटीआय) : 2 जागा
सेल्स/गोडाऊन एक्झीक्युटीव्ह (ग्रॅज्युएट) : 2 जागा
अकाऊंट एक्झीक्युटीव्ह (बी.कॉम) : 2 जागा
कम्प्युटर ऑपरेटर (कॉम्प्युटर कोर्स पास) : 2 जागा
कॅशियर (बी.कॉम) : 2 जागा
कॉलिंग एक्झीक्युटीव्ह (12 वी पास) : 2 जागा
दिग्विजय मोटर्स ॲथोराईज्ड डीलर - हिरो मोटोकॉर्प लि.
9890335070 9028015644, 9028015641
भास्कर आयकॉन, पुणे-नगर बायपास रोड, विघ्नहर्ता हॉस्पिटल जवळ, बाबुराव नगर, शिरुर.
शोरूम नगरकडे थिटे कॉलेज बाबुराव नगर पुणे -नगर हायवे शिरुर शहर रिलायन्स पेट्रोल पंप


नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
स्तनांचे आजार आणि उपचार
PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

तुमच असणं सर्व काही होतं, आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं,
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे,
पण तुमचं नसणं, हीच मोठी उणीव आहे.
भावपूर्ण श्रद्धांजली
प्रसिध्द बैल गाडामालक
कै.मच्छिंद्रशेठ बाबुराव म्हस्के
वय - ८५ वर्षे
यांचे मंगळवार दि.३०/०१/२०२४ रोजी निधन झाले
दशक्रिया विधी
गुरुवार दि. ०८/०२/२०२४ रोजी सकाळी ७.१५ वा.
वैकुंठधाम चोंभूत, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे संपन्न होईल.
प्रवचनकार
ह.भ.प.प्रा.नवनाथ महाराज माशेरे (आमदाबाद, ता.शिरुर)
साई फ्लेक्स अळकुटी 7709061159
गं.भा.सुंदराबाई मच्छिंद्र म्हस्के (पत्नी)
श्री.लक्ष्मणशेठ बाबुराव म्हस्के (भाऊ) (मा.संचालक कृ.उ. बा. समिती, पारनेर)
श्री.मारुती बाबुराव म्हस्के (भाऊ)
श्री.विलास बाबुराव म्हस्के (भाऊ)
श्री.तुकाराम मच्छिंद्र म्हस्के (मुलगा)
श्री.गोरख मच्छिंद्र म्हस्के (मुलगा)
श्री.संतोष मच्छिंद्र म्हस्के (मुलगा)
श्री.खंडू लक्ष्मण म्हस्के (पुतण्या)
श्री.दत्तात्रय मारुती म्हस्के (पुतण्या)
श्री.अभिजित विलास म्हस्के (पुतण्या)
शोकाकूल : लोकनियुक्त सरपंच,उपसरपंच, सदस्य आणि वि. वि. कार्यकारी सोसायटी चेअरमन, व्हा.चेअरमन संचालक, समस्त ग्रामस्थ चोंभूत (ता. पारनेर )

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी




# ...तर वावराल आत्मविश्वासाने!



**स्त्रियांची अंतर्वस्त्रं हा आपल्याकडे गोपनीयतेचा विषय मानला जातो. त्याविषयी चर्चा तर सोडाच, चारचौघात ब्राचा उच्चार करणंसुद्धा पाप असल्यासारखं वाटतं. त्यामुळेच की काय, अंतर्वस्त्रांबाबत, त्यातल्या प्रकारांबाबत, उपलब्धतेबाबत आजच्या भारतीय मुलीला अगदी कमी माहिती असते. परिणाम – अयोग्य मापाची अंतर्वस्त्रं वापरणं. आधुनिक कपड्यांमध्ये आत्मविश्वासपूर्वक वावरायचं असेल तर अंतर्वस्त्रांची निवडही अचूक असायला हवी. नेमकी याविषयीच आपल्याकडे अनास्था आहे. योग्य मापाची ब्रा वापरणं स्त्रीच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचं आहे. म्हणूनच बोलायला अवघड पण आवश्यक अशा विषयासंदर्भात चर्चा करणे तितकेच गरजेचे आहे.**

आजची मुलगी अनेक बाबतीत आधुनिक झालीय, फॅशन कॉन्शस झालीय. वेगवेगळ्या स्टाइलचे, वेगवेगळ्या आधुनिक प्रकारचे कपडे घालणं तिला आवडायला लागलंय. पण अशा कपड्यांसाठी आवश्यक असणारी अंतर्वस्त्र मात्र ती त्याच जुन्या पद्धतीची वापरतेय किंवा अयोग्य पद्धतीनं वापरतेय. त्यामुळे फॅशनेबल कपड्यातसुद्धा काही मुली विचित्र दिसतात. त्यातून त्यांचा आत्मविश्वास कमी होतो आणि कायमचा न्यूनगंड मनात तयार होतो. एका मोठ्या हॉस्पिटलशी संबंधित स्त्रीरोगतज्ज्ञांशी बोलतानाही या विषयी आपल्या स्त्रियांच्या मनात किती अनास्था असते याची जाणीव झाली. महागडे, फॅशनेबल कपडे घालणाऱ्या स्त्रिया अंतर्वस्त्रांबाबत कमालीची अनास्था दाखवतात. थोडे पैसे या गोष्टीवरही खर्च करा, असं त्यांना म्हणावंसं वाटतं, हा त्यांचा अनुभव. अंतर्वस्त्रं हा तसा खासगी मामला. इंग्रजीत याला ब्रीफ्स म्हणतात. छोटी पण महत्त्वाची गोष्ट. पण आपल्याकडे आहे तितकी दुर्लक्षित ही इतरत्र कुठेही नाही. पाच मिनिटांत होणारी ही खरेदी. दुकानात जाऊन खाली बघत सांगितलेला साईझ आणि त्यावर तो देईल तो ठरलेला माल घेऊन परत यायचं. पण हल्ली मोठ्या शॉपिंग मॉलमध्ये लाँजरीज असा मोठा सेक्शन दिसायला लागलाय. त्यातले प्रकार, साईझ यांचं वैविध्य किमान नजरेत आलंय. त्यामुळे थोडी जागरूकता यायला लागली आहे. तरीही आपल्यासाठी कोणता प्रकार योग्य हे ठरवायला मात्र आणखी थोडी माहिती असणं आवश्यक आहे. ड्रेसचं वैविध्य आणि त्यातल्या वेगवेगळ्या स्टाइल जितक्या चटकन आत्मसात केल्यात तेवढी तत्परता या खासगी खरेदीत आपण अद्याप दाखवलेली नाही. किंबहुना हा विषय अनेक मुलींना फार महत्त्वाचा वाटतच नाही.



## योग्य तीच ब्रा

तुमचा बांधा सुडौल दिसण्यात चांगल्या ब्राचा खूप मोठा वाटा आहे. लहान वक्षभाग असणाऱ्या मुलीसुद्धा पॅडेड ब्राज् घालून योग्य गोलाईचा आभास निर्माण करू शकतात. ज्यांचा हा भाग जरा जास्त मोठा असेल त्यांनीसुद्धा जर योग्य प्रकारच्या ब्राज् निवडल्या नाहीत तर त्या थकलेल्या वाकलेल्या दिसतात आणि ते अर्थातच बरे दिसत नाही. कित्येक स्त्रिया ज्या आयुष्यभर ब्राच वापरत आल्या आहेत, त्यांना त्यांच्या ब्राचे नेमके मापच माहीत नसते. प्रत्येक स्त्रीचा बांधा, माप वेगवेगळे असते. जाड, बारीक, भरीव! त्यात लाज वाटण्यासारखे काहीच नाही. तुमचे माप जसे असेल तसे अंतर्वस्त्रांच्या दुकानात जाऊन तसे मागा. नशिबाने हल्ली अशा बऱ्याच दुकानात हुशार चुणचुणीत मुली कामाला असतात. ज्या तुम्हाला तुमचे योग्य माप घेऊन त्या मापाच्या ब्रा शोधून घ्यायला मदत करतील. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, प्रत्येक वेळेस वजन कमी किंवा जास्त झाले तर आपल्या छातीचे मापसुद्धा कमी जास्त होते. स्त्रियांचे ब्राचे माप आयुष्यभर बदलत राहते. याबद्दल अभिनेत्री करिना कपूर सांगते, की जेव्हा मी वजन कमी केले व साईज झीरो झाले तेव्हा अर्थातच माझ्या कमरेच्या वरच्या भागाचे माप कमी झाले. पण जस जसे पुन्हा वजन वाढले तस तसे तेसुद्धा वाढत गेले. त्यामुळे माझे ब्राचे मापसुद्धा बदलावे लागले नाही तर त्या लहान ब्रामध्ये श्वास घेणे मुश्कील झाले असते.



## खरेदीचे निकष

ब्रा किंवा पँटीची योग्य निवड करण्याचा पहिला आणि महत्त्वाचा बेसिक निकष कोणता तर, ती बाहेर दिसता कामा नये. अंतर्वस्त्र याचाच अर्थ ती वस्त्र कपड्यांमधून बाहेर डोकावता कामा नयेत. लो वेस्ट जीन्समधून खाली वाकल्यावर दिसणारी कडा किंवा इनकट्सच्या टॉपमधून डोकावणारा पांढरा पट्टा अगदीच वाईट दिसतो. हे आपल्यालाही कळत असतं. मग असे कपडे घातल्यानंतर आपला अर्धा वेळ आणि पूर्ण लक्ष बाही नीट करण्यात किंवा कपडे सावरण्याकडे जातं. अजाणतेपणी आपण आपला कॉन्फिडन्स गमवायला लागतो. म्हणूनच असे बोल्ड कपडे वापरायचे असतील, तर त्याच्या आत सुयोग्य कपडे वापरणं आवश्यक आहे. हल्ली बाजारातल्या फॅशनेबल कपड्यांवर नजर टाकली तर लक्षात येईल की, लो कट टॉप्स, नूडल स्ट्राईप्स, इनकट्स असे अनेक प्रकार दिसताहेत. आपणही असे कपडे घ्यावेत आणि वापरावेत असं अनेक मुलींना वाटतं, पण ते आपल्याला कसं दिसेल याची पहिली चिंता असते आणि त्याच्या आत काय घालायचं ही दुसरी मोठी चिंता असते. वेगवेगळ्या आऊटफिट्सची वेगवेगळी गरज असते. हे लक्षात घेऊनच त्यांची निवड करावी लागते. काळ्या सेमी ट्रान्स्परंट ड्रेसच्या आत घालायची ब्रा कशी हवी आणि पांढऱ्या ट्रान्सपरंट ड्रेसच्या आत कशी ब्रा हवी, याचं उत्तर काळी आणि पांढरी इतकं साधं सोपं नाहीय. ड्रेसची गरज आणि तुमचा कंफर्ट बघून योग्य ब्राची निवड करायला हवी.

## ...तर नवीन ब्राची गरज

दर थोड्या महिन्यांनी जेव्हा तुम्ही नवीन अंतर्वस्त्र खरेदी करता तेव्हा प्रत्येक वेळेस तुमचे माप घेऊनच ती खरेदी करा. योग्य माप असेल तर ती तुमच्या पाठीला, खांद्याला काचणार, रुतणार नाही. पट्ट्यांमुळे ब्रा व्यवस्थित जागच्या जागी बसणे अपेक्षित आहे. ब्रा जर का मोल्डेड किंवा सॉफ्ट होजिअरी असेल तर ती अंगासरशी घट्ट बसणेच अपेक्षित आहे. त्यात चुण्या पडणे, जागा राहणे अपेक्षित नाही. तसे जर होत असेल तर तुम्हाला नवीन ब्राची आवश्यकता आहे. भारतात काही काही ब्रँड्स ठरावीक मापाच्या ब्रा ठेवतच नाहीत. हे अतिशय चुकीचे आहे. पण म्हणून चुकीच्या मापाच्या मात्र घेऊ नका. अगदी महागाईच्या लापर्ला किंवा पैसा वसूल मार्क्स अँड स्पेन्सर कोणताही ब्रँड असू दे घालून बघितल्याशिवाय तुम्हाला कोणती व्यवस्थित बसते तुम्हाला कळणार नाही.



## तुमच्या चणीसाठी कोणती निवडाल?



- बाल्कोनेट : थोड्या लहान चणीच्या स्त्रियांसाठी हा योग्य प्रकार आहे. खोल गळ्यांच्या पोशाखाच्या आत त्या छान दिसतात. त्यामुळे Cleavage व छातीचा आकार उठावदार दिसायला मदत होते. आमान्ते ही कोणत्याही दुकानात मिळणारी एक छान बसणारी बाल्कोनेट ब्रा आहे.
- पुश-अप : पुश-अप हा प्रकार खूप लोकप्रिय होतो आहे. वंडरब्राने लहान चणीच्या स्त्रियांसाठी ही कमाल केली आहे. या घातल्यानंतर अधिक सुडौलपणा आणि गोलाई जाणवते. या प्रकारात ला सेन्झा आणि ट्रायम्फ यांचे परवडण्याजोगे आणि अनेक रंगांतले पर्याय उपलब्ध आहेत.
- अंडर वायर फुल कप : जरा मोठ्या मापाच्या स्त्रियांसाठी योग्य या सॉफ्ट आणि मोल्डेड कप्समध्ये मिळतात. खालच्या बाजूला असलेल्या वायरमुळे छान आधार मिळतो आणि छाती ओघळल्यासारखी दिसत नाही व बांधा सुडौल दिसायला मदत होते. सगळ्यात चांगली गोष्ट अशी की, या सर्व ब्रँड्समध्ये सर्वच मापांत भरपूर उपलब्ध असतात.
- टी शर्ट : प्रत्येक मुलींकडे टी शर्टच्या आत घालायला शिवण दिसणार नाही अशी ब्रा हवीच. करिना कपूर सांगते, की मी तर नेहमी आतले कपडे खरेदी करताना घट्ट बसणारा टी शर्ट घालून जाते. त्यामुळे आपण जे खरेदी करतो ते आपल्याला योग्य तऱ्हेने बसते आहे, हे कळते.
- स्ट्रॅपलेस : स्ट्रॅपलेसची निवड करताना तुम्ही खात्री करूनच घेतली पाहिजे. थोडा जास्त वेळ व पैसे गेले तरी चालेल. कारण वन शोल्डर किंवा स्ट्रॅपलेस ड्रेसच्या आतून नाचाला जातानाच तुम्ही ही वापरणार. ती व्यवस्थित बसली पाहिजे. पट्टा थोडा रूंद असेल व खाली वायर असेल असेच पाहा. मग तुमचे माप काहीही असो.
- स्पोर्ट्स ब्रा : व्यायाम करणाऱ्या सर्वांसाठी ही अत्यावश्यक. ती घेतल्याशिवाय जिमला जाणे अशक्यच. त्या तशा जाड व दणकट बनवल्या जातात. ट्रेडमिलवर धावताना किंवा इतर व्यायाम करताना सर्व जागच्या जागी ठेवण्यात यांचा सहभाग मोठा असतो. कोणतेही खेळाचे कपडे बनवणारी कंपनी जसे नाइके, आदिदास किंवा लॅकोस्टच्याच स्पोर्ट्स ब्रा चांगल्या असतात. इतर साध्या नकोतच.



- न्यूड ब्रा : बऱ्याच वेळा बायकांना असा प्रश्न पडतो की, माझा पांढरा ड्रेस जरासा पातळ आहे. मग मी आता कोणती ब्रा वापरू? तुम्हाला काय वाटले उत्तर पांढरी असे असेल? चूक- अगदी काळी घालण्यापेक्षा पांढरी बरी! पण खरे, उत्तर आहे ते त्वचेच्या रंगाची. त्यामुळे सर्वत्र सारखा रंग दिसतो व ब्रा वेगळी उठून दिसत नाही. पण अर्थातच खूप फिक्या रंगाचे टॉप असतील तरच. काळ्या शर्टच्या आतून नाही. नाहीतर आत काहीच घातले नसल्याचा भास होईल.
- कॉरसेट : हल्लीच्या काळातसुद्धा कॉरसेट मिळतात. स्ट्रॅपलेस ब्राचा नवीन अवतार म्हणजे कॉरसेट्स. त्यांचा एक फायदाही आहे, तो म्हणजे त्यात पोट आत खेचले जाते व सपाट दिसायला मदत होते. बहुतेकदा आपल्या त्वचेच्याच रंगात त्या मिळतात. त्या फारशा मादक वगैरे दिसत नाहीत. पण व्यायाम व डाएटचा जेव्हा फारसा परिणाम दिसत नाही तेव्हा बारीक दिसायला मदत मात्र नक्कीच होते. स्पँक्स हे त्यातले प्रसिद्ध नाव आहे. बारीक दिसायचे असेल तर हीच अंतर्वस्त्रे हवीत.


### सपोर्टचे काय?

**कोणत्याही चांगल्या सहकाऱ्याप्रमाणेच तुमच्या ब्रानेसुद्धा तुम्हाला अवघड प्रसंगी आधार देणे अपेक्षित असते. जर तुम्ही छातीकडे भरलेल्या असाल तर नाजूक बारीक पट्टे असलेल्या ब्रा घेण्यात काहीच अर्थ नाही. उगाच दिवसभर ते वरखाली ओढण्यातच सगळे लक्ष जाते. वेगवेगळ्या प्रकारच्या कपड्यांमध्ये त्याचे कापड, गळा यावर ब्राचा प्रकार अवलंबून ठेवावा लागतो. आपल्या छातीला व्यवस्थित आधार आणि आकारसुद्धा देईल अशीच ब्रा असायला हवी.**

# लिपस्टिकसाठी योग्य रंगाची निवड महत्त्वाची

**पहिल्यांदा ओठांवरची जीर्ण त्वचा काढून टाका. लिपबाम लावून ओठांची काळजी घ्या. जर तुम्हाला तुमची लिपस्टिकच उठावदार बनवायची असेल तर मेकअप थोडा लाइटच हवा. सगळ्या चेहऱ्यावरच रंगरंगोटी कराल तर ते भडक दिसेल. ओठांवर शिमर लावणं अनेकींना आवडतं. पण तुमच्या चेहऱ्याला ते साजेसं आहे का? हेसुद्धा पाहा. यासाठी तुम्ही क्रीमी फिनिशिंग असलेल्या लिपस्टिकची निवड करू शकता.**

लिपस्टिकसाठी योग्य रंगाची निवडही अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक रंगाप्रमाणे त्याचा प्रभावही निराळा असतो. शिवाय रंगाइतकीच महत्त्वाची असते रंगछटा. एखाद्या महत्त्वाच्या कार्यक्रमाला जाताना घाईघाईत कुठलीही नवी रंगछटा वापरू नका. आधी ती आपल्याला छान दिसतेय का? हे पाहा. प्रायमर वापरायला चुकू नका. लिपस्टिक लावण्याआधी प्रायमर लावणं गरजेचं आहे. त्यामुळे लिपस्टिकची छटा अधिक उठावदार होते. शिवाय लिपस्टिक दीर्घकाळ टिकून राहते. कधी प्रायमर नसेल तर फाऊंडेशनचाही वापर करू शकता. योग्य तो लिप लायनर जरूर वापरा. तुमच्या ओठांच्या रंगाशी मिळतीजुळती छटाही लिप लायनरसाठी वापरू शकता. लिप लायनरमुळे लिपस्टिक पसरण्यापासूनही वाचवू शकता. लिपस्टिकला आणि ओठांना एक छानसा आकार या लिपलायनरमुळे येतो. लिपस्टिक लावताना ओठांच्या मधून लावायला सुरुवात करा. आसपासच्या कडांना लिपस्टिक लावायची असेल तर लिप ब्रशचाही वापर करू शकता. खूप जोर देऊन लिपस्टिक वापरू नका. हलक्या पद्धतीने योग्य दाब देऊन लावलेली लिपस्टिक जास्त काळ टिकते.



ओठांच्या कडांकडेही लक्ष द्या. नाहीतर मधल्या भागात लिपस्टिक छान पण कडेला मात्र पसरलेली किंवा ओठांबाहेर गेलेली असेल तर तुमचा संपूर्ण लुक त्यामुळे खराब दिसू शकतो. एकदा लिपस्टिक लावून झाली की टिश्यू पेपरने ती हलकेच टिपा. यामुळे ओठांवर जर एखाद्या ठिकाणी लिपस्टिकचा जास्तीचा थर जमा झाला असेल तर तो टिपला जातो. लिपस्टिक एकसंध दिसू लागते. अशाप्रकारे ओठ टिपल्याने तुम्हाला आधी लावलेल्या लिपस्टिकच्या वर दुसऱ्या रंगछटेचा किंवा ग्लॉसचा थर द्यायचा असेल तरीही ते सोपं जातं. लिपस्टिक लावण्याविषयी तर बरंच समजलं. आता लिपस्टिक काढण्याविषयी. कधीही पार्टीहून किंवा समारंभाहून आल्यावर लिपस्टिक तशीच ठेवून झोपू नका. एकतर उशीवर डाग पडतीलच शिवाय तुमच्या ओठांसाठीही ते बरं नव्हे. लिपस्टिक नीट धुऊन टाका. मगच झोपा.

# सणासुदीत असे रहा फिट!

**कोणताही सण–उत्सव असो, आपण आनंदित असायला हवे. त्यातच आपले आरोग्य सुदृढ असेल तर आपल्या आनंदाला तर सीमाच राहत नाही, मात्र बऱ्याचदा आपले आरोग्य ऐन सणासुदीत ढासळते आणि आपल्या आनंदावर विरजण पडते. असे होऊ नये म्हणून आपण कसे फिट राहू याबाबत काही टिप्स...**

- रोज किमान ३० मिनिट पायी फिरणे आणि आवश्यक प्रमाणात पाणी पिणे ही सवय आपणास फिट राहण्यास खूप मदत करेल.
- ध्यानधारणेबरोबरच व्यायाम करायला विसरू नये. सण–उत्सव असले तरी जास्त प्रमाणात मिठाई खाणे टाळावे. बाहेरील तळलेले पदार्थ तर मुळीच खाऊ नये. यामुळे आपले आरोग्य धोक्यात येऊ शकते.
- कॅलरीयुक्त खाणे टाळावे. नातेवाईकांकडे जाणार असाल तर घरून काहीतरी खाऊन जा, जेणेकरून आपणास तीव्र भूक लागणार नाही.
- आपल्या घरीच पोषणयुक्त आहार खा. तसेच फ्रीजमध्ये ताज्या आणि हिरव्या भाजीपाला ठेवा. सणात आपले आरोग्य स्वस्थ ठेऊनच आपण आपल्या परिवारासोबत भरपूर मौज–मस्ती करू शकता.
- पाण्यामुळे आपली पचनक्रियाबरोबर रक्ताभिसरण क्रियादेखील चांगली राहते. तसेच अतिरिक्त कॅलरीदेखील कमी करण्यास मदत होते. रोज १०–१२ ग्लास पाणी पिल्याने आपण स्वस्थ राहणार आणि आपल्या चेहऱ्यावरदेखील चमक दिसेल.



# लाँग कुर्ता पुन्हा फॉर्मात

सलवार कमीझचं नाव घेताक्षणी नव्या पिढीच्या कोणत्याही फॅशनप्रेमी तरुणीच्या डोक्याला आठ्या येणं सहाजिकच आहे. आईच्या कपाटातले ते ढगळ सलवार कमीझ घालण्यासारखं दुसरं दुःख नाही. नुसतं खात बसून कमरेचे टायर बनवायचे आणि ते झाकायला सलवार सूट्स घालायचे, असं काहीसं मत या सलवार कमीझबद्दल असतं. पण गेल्या काही दिवसांपासून फॅशन स्ट्रीटपासून ते फॅशन स्टोअर्सपर्यंत प्रत्येक ठिकाणी पायघोळ कुर्ता आणि स्ट्रेट फिट सलवार दिसू लागली आहेत. जुन्या सलवार कमीझचं हा मॉडर्न अवतार आहे, असं म्हणायला हरकत नाही. विशेष म्हणजे कॉलेजपासून ते किटी पार्टीपर्यंत सर्वच ठिकाणी अगदी सगळ्या वयोगटातल्या स्त्रिया हा ट्रेंड फॉलो करत आहेत. मुळात हा ट्रेंड आपला नसून आखाती देशातील स्त्रियांकडून घेतलेला आहे. पांढऱ्या किंवा पेस्टल शेडच्या बॅकग्राऊंडवर फ्लोरल प्रिंट्समध्ये हे कुर्ते पहायला मिळतात. शक्यतो त्यांच्या हेमला लेस लावलेली असते. फिटींगला लूझ असले, तरी त्याखाली वापरल्या जाणाऱ्या ब्राईट शेडच्या स्ट्रेट फिटच्या सलवारने त्यांना फेमिनाईन लुक मिळतो. हे कुर्ते घोट्यापर्यंत उंचीचे म्हणजे अँकल लेन्थ असतात. ते तसेच वापरावेत. आपली उंची कमी आहे म्हणून शॉर्ट कुर्ता घेतल्यास त्याची मजा कमी होईल. या सलवार कुर्त्यांसोबत दुपट्टा घेण्याची गरज नसते. त्यामुळे सुटसुटीत आणि स्टायलिश डेसिंगचे चाहते असाल तर हा नवा पर्याय वापरून पहाच.



## शॉर्ट न्यूज

### शहापूर ते मेहेकरी रस्ता बनवण्याची मागणी

**मेहेकरी :** रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेकांना जीव गमावा लागत असून मागील ३ ते ४ वर्षापासून कल्याण अहमदनगर, नांदेड या मार्गाचे काम संथ गतीने सुरू आहे. या रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावे अशी मागणी संघटनेच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग अहमदनगरचे उपविभागीय अभियंता दि. ना. तारडे यांच्या कार्यालयावर चपलाचा हार घेऊन आंदोलन करण्यात आले होते. व येत्या १५ दिवसानंतर रस्त्याचे तांत्रिकदृष्ट्या उत्तम डांबरीकरणाने खड्डे बुजवण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

### मोबाईल चोरी करणारा पोलिसांच्या ताब्यात

**नगर :** महागडे मोबाईल चोरी करणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी खालापुर येथून ताब्यात घेत अटक केली आहे. ज्ञानेश्वर तुकाराम जाधव असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून दीड लाख रूपये किमतीचे तीन मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. शुभम कुंडलिक वाफारे हे त्यांच्याकडील वाहन घेऊन मुंबई येथे जात असताना केडगाव बायपास येथे वाहन नादुरूस्त झाल्याने ते शोरूममध्ये गेले असता चोरट्याने वाफारे यांचा एक व त्यांच्या मित्राचे दोन असे तीन मोबाईल चोरून नेले होते.

### निळवंडेच्या कामात मदत न करणारे श्रेय घेताहेत

**संगमनेर :** सातत्याने पाठपुरावा करून काम केले म्हणून निळवंडे धरण, डावा आणि उजवा कालव्याचे काम पूर्ण झाले. या कामात मदत न करता सातत्याने अडचणी निर्माण करणारे आज श्रेय घेऊ पाहत असल्याची टीका माजी महसूलमंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांनी केली. राज्य सरकारमध्ये ताळमेळ नसून आगामी काळात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांदुरी दुमाला येथे उजव्या कालव्याचे जलपूजन आमदार थोरात यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. प्रसंगी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, अ‍ॅड. माधव कानवडे उपस्थित होते.

### अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवले

**भिंगार :** कॅम्प पोलीस ठाणे हद्दीतून एक अल्पवयीन मुलगा व मुलीला अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस त्या अल्पवयीन मुलगा व मुलीचा शोध घेत आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाणे हद्दीतून एका अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याची घटना रविवारी (दि. ४) सकाळी आठ ते साडेअकराच्या दरम्यान घडली. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने काल रात्री उशिरा भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती देत फिर्याद दिली आहे.

### वैद्यकीय आघाडी तालुकाध्यक्षपदी निवड

**जामखेड :** येथील सनराईज मेडिकल अ‍ॅन्ड एज्युकेशन फौंडेशन चे संस्थापक अध्यक्ष व प्रयत्न हॉस्पिटलचे संचालक डॉ संजय भोरे यांची भाजपा जामखेड तालुका वैद्यकीय आघाडी तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या अगोदर मा आ. प्रा. राम शिंदे यांची २००७ मध्ये जामखेड भाजपा तालुकाध्यक्ष निवड झाली तेव्हा डॉ संजय भोरे हे जामखेड तालुका डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष होते त्यांचे वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील काम पाहुण त्यांनी डॉ संजय भोरे यांची भाजपा वैद्यकीय आघाडी तालुकाध्यक्षपदी नियुक्ती केली होती.

# न्याय हक्कांबाबत ग्राहकांनी जागरूक रहावे!

**■ निवृत्त न्यायाधीश बाळासाहेब खराडे यांचे प्रतिपादन**
**■ ग्राहक पंचायत संस्थेचे रांजणगांवला उद्घाटन**



शिरुर : प्रतिनिधी

**ग्राहकांचे अनेक ठिकाणी शोषण होते, ग्राहकांच्या न्याय हक्काबाबत ग्राहकांनी जागरूक राहिले पाहिजे, ग्राहक पंचायत पुणे जिल्हा ही संस्था ग्राहकांना निश्चित न्याय मिळवून देईल, असे प्रतिपादन निवृत्त जिल्हा न्यायाधीश बाळासाहेब खराडे यांनी येथे बोलताना केले.**

तीर्थक्षेत्र रांजणगाव महागणपती मंदिरामधील सभागृहामध्ये ग्राहक पंचायत संस्था पुणे जिल्हा या राज्यव्यापी संस्थेचा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी श्री. खराडे बोलत होते.

ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी यांच्या विचाराने व सोबत काम करून प्रेरित होऊन सामाजिक कार्यकर्ते अशोक रावसाहेब भोरडे यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी व ग्राहकांना शोषणमुक्त करण्यासाठी ही संस्था स्थापन केली आहे.

यावेळी बोलताना खराडे पुढे म्हणाले, गोरगरीब ग्राहकांसाठी ग्राहक पंचायत या संस्थेने अतिशय मोलाची कामगिरी करत भविष्यात अनेक लोकोपयोगी व जनहितार्थ कामे करून समाज शोषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच ग्राहक पंचायत कोणा विक्रेत्याच्या विरोधात नसून, ती अनुचित व्यापार करणाऱ्या प्रवृत्ती सुधारण्यासाठी प्रयत्न करत आहे. सामान्य लोकांना न्याय देण्याचे प्रामाणिकपणे काम करावे.

यावेळी शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, उपकार्यकारी अभियंता महावितरण शिक्रापूरचे नितीन महाजन, शाखा अभियंता पाचुंदकर, रांजणगाव देवस्थानच्या अध्यक्षा स्वातीताई पाचुंदकर, ग्राहक पंचायत पुणे जिल्ह्याचे संस्थापक अध्यक्ष अशोक भोरडे, राज्य उपाध्यक्ष जनार्दन पांढरमिसे, यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी लोणीकंद पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईगडे ,रांजणगाव एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड, वनपरिक्षेत्र शिरूरचे प्रताप जगताप, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था शिरूरचे अरुण साकोरे, या मान्यवरांनी संस्थेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित नागरिक ग्राहक पंचायतचे पदाधिकारी यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून निवृत्त जिल्हा न्यायाधीश बाळासाहेब खराडे यांनी उपस्थितांना कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी अ‍ॅड.बाबुराव ढमढेरे ,भगवान थोरात, सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अरुणकुमार मोटे, तेजस फडके, संदीप कुटे, चेतन भोर, अभिषेक टेंभेकर, संदीप टूले, प्रमोद लांडे, बाबासाहेब थिटे, अतुल पाचुंदकर, दत्तात्रय रवलेकर, माजी सरपंच प्रवीण आव्हाळे, अ‍ॅड.गणेश तोडकर, उद्योजक विजय करपे, राहुल करपे, बापूसाहेब शिवले, बंडूआप्पा गवारे तसेच शिरूर, हवेली, दौंड, जुन्नर, खेड या तालुक्यातून मोठ्या प्रमाणात ग्राहक पंचायत चे कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# प्रसाधनगृह वापरण्याच्या 'ती'च्या हक्कावर गदा!

**■ जनजागृतीच्या अभावामुळे महिला हक्कांपासून वंचित**
**■ शिरूर बसस्थानकावर प्रसाधनगृहासाठी महिलांकडून शुल्क**

शिरुर : सतीश डोंगरे






**भारतीय कायद्याने १८६७ च्या कलम ७(२) नुसार कोणत्याही पेट्रोलपंप तसेच हॉटेल्समध्ये प्रसाधन गृहाचा मोफत वापर करण्याचा हक्क महिलांना दिला आहे. हा अधिकार नाकारणाऱ्यांना कलम १४ नुसार दंड होऊ शकतो. मात्र, जनजागृतीच्या अभावामुळे ते उपलब्ध करून देण्यास प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे.**

अनेकवेळा पुरेशी प्रसाधनगृहे उपलब्ध नसल्यामुळे कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या महिलांची नेहमीच कुचंबणा होते. अशावेळी हॉटेल्स, पेट्रोलपंप, मॉल्स व पंचतारांकित हॉटेलमधील प्रसाधनगृहांचा महिला हक्काने उपयोग करू शकतात. मात्र, याबाबत जनजागृतीचा अभाव असल्यामुळे सुविधा उपलब्ध असूनही महिला त्यापासून वंचित राहतात ज्यामुळे महिलांना तासनतास लघवी रोखून धरावी लागते. परिणामी महिलांना अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे.

हॉटेल्स, पेट्रोलपंप, मॉल्स व छोट्या मोठ्या हॉटेल मालकांनी दर्शनी भागात येथील प्रसाधनगृह महिलांना निःशुल्क वापरता येईल असे फलक लावावेत. त्यामुळे नागरिकांच्या राईट टू पीचे उल्लंघन होणार नाही. घराबाहेर पडणाऱ्या महिलांना हे सोयीचे होईल, असे शिरूर शहरात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांनी सांगितले.

### शिरुर बसस्थानकावर महिला प्रसाधनगृहासाठी शुल्क !

**एस टी महामंडळाच्या राज्यभरातील बस स्थानकावरील प्रसाधन गृह महिलांसाठी मोफत असताना नव्याने आकाराला येत असलेल्या शिरूर येथील बसस्थानकावर मात्र प्रसाधनगगृहाचा वापर करणाऱ्या महिलांकडून शुल्क आकारण्यात येत आहे, त्यामुळे महिला वर्गांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. शिरूर शहरात महिलांसाठी आधीच पुरेशी प्रसाधनगृहे उपलब्ध नाहीत, जी उपलब्ध आहेत त्यांची अवस्था फारशी चांगली नाही. अनेक स्वच्छतागृहांमध्ये अस्वच्छता आणि घाणीचे साम्राज्य आहे. बऱ्याचदा पाण्याचीही पुरेशी व्यवस्था नसते. त्यामुळे कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या महिलांची नेहमीच कुचंबणा होते. त्यातच आता शिरूर बसस्थानकावर प्रसाधनगृहाचा वापर करण्यासाठी शुल्क आकारण्यात येत असल्याने महिलांनी संताप व्यक्त केला.**

## वाचकांच्या लेखणीतून

### होंठ इतने भी ग़रीब न हों



शरीरसंबंधापेक्षा चुंबन घातक; रोगजंतू पसरतात! असा लेख वाचण्यात आला (पारनेर दर्शन, ४ फेब्रुवारी, रविवार)

एक बोसे के भी नसीब न हों।
होंठ इतने भी अब ग़रीब न हो।।

एक चुंबनही (यांच्या) नशिबात नसावे?
(आपले) ओठ इतकेही गरीब नसावेत! असे फ़रहत एहसास म्हणतात.

साधारणतः रविवारी कुठल्याही वृत्तपत्रात अग्रलेख प्रकाशित होत नाहीत. पण मुंबईच्या लोकसत्ता दैनिकात तसे ते प्रकाशित होत असत. त्यावेळी विद्याधर गोखले लोकसत्ता दैनिकाचे संपादक होते. (ते पत्रकारितेच्या क्षेत्रातील माझे एक गुरूस्थान आहे). लोकसत्तेच्या रविवारच्या अंकातील त्यांचे लेख चुरचुरीत, खेळकर आणि शृंगारिकही असत. खरे तर गोखले अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. ते पत्रकार होते. संपादक होते, नाटककार होते. कवीही होते. वक्ते होते. नटही होते. त्यांचा उर्दू भाषेचा दांडगा व्यासंग होता. उर्दू शायरीवर शायरीचा शालीमार नामक पुस्तकही त्यांनी मराठीत लिहिले आहे. लोकसत्ताच्या रविवारच्या अंकातील त्यांच्या लेखांना ग्रंथरूप मिळाले आहे.

या रसिकराज संपादकांनी अतिरेकी चेंगट चुंबन नावाचा सुंदर शृंगारिक लेख एका रविवारच्या लोकसत्ताच्या अंकात लिहिल्याचे आठवते. रसिकांनी तो जरूर वाचावा. रसिक निर्माण करता येत नाही. रसिक असावा लागतो. असे यशवंतराव चव्हाण म्हणत असत.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# हळदी कुंकू समारंभातून महिलांना दिला आरोग्याचा संदेश

**डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयचा अनोखा अभिनव उपक्रम**

नगर : प्रतिनिधी

**मकारसंक्रांती निमित्त डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयातील सामाजिक आरोग्य विभाग परिचर्या विभाग व माहिला सेलने वडगाव गुप्ता येथील महिलांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. या निमित्ताने गावातील १५० महिला करिता हळदी कुंकू व तिळगूळचा कार्यक्रम घेण्यात आला.**

प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सरपंच सौ. सोनुबाई विजय शेवाळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सोनाली वाहडणे (स्त्री. रोगतज्ञ) वाहाडणे हॉस्पिटल, अहमदनगर ह्या होत्या तसेच सौ कविता बबन वाकळे (तलाठी), सौ. निता शिवराम गीरी (साहाय्यक कृषि अधिकारी) डॉ.सुवर्णा कांबळे (सामाजिक आरोग्य अधिकारी) व डॉ. प्रतिभा चांदेकर, प्राचार्या, परिचर्या महाविद्यालयाच्या व डॉ. योगिता औताडे उप प्राचार्या व सामाजिक आरोग्य विभाग परिचर्या विभाग प्रमुख उपस्थतीत होत्या.

या निमित्ताने महिलांसाठी डॉ. सोनाली वाहडणे स्त्री रोग तज्ञ यांनी महिलांमध्ये योनी मुख मार्गाचा कर्करोग व स्तनाचा कर्करोग



याविषयी सविस्तर मार्गदर्शन करून व चर्चा केली. या प्रसंगी त्या म्हणाल्या कि महिलांनी आपलया ९ ते १४ वर्ष वयोगटातील मुलींचे योनी मार्गाच्या कर्करोग होऊ नये यासाठी लसीकरण करणे आवश्यक आहे तसेच, समतोल आहार रोज एक तास व्यायाम करणे गरजेचे आहे आणि प्रत्येक महिन्यात मासिक पाळी नंतर स्व-स्तन परीक्षण करून जर त्यात काही बदल जाणवले तर त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे, वयाच्या ४५ वर्षानंतर स्तनांची सोनोग्राफी (म्यॅमोग्राफी) करणे आवश्यक आहे. म्हणून महिलांनी स्वतः च्या आरोग्य संदर्भात जागरूक असावे. लवकर निदान व योग्य उपचारातून कर्करोग बारा होऊ शकतो व आपले आयुष्य सुखकर होऊ शकते.

परिचर्या महाविद्यालयातील स्त्री रोग विभाग प्रमुख सौ. कविता भोकनळ व सहायक प्राध्यापक सौ मोहिनी सोनवणे यांनी स्व-स्तन परिक्षण कसे करावे या विषायी प्रात्यक्षिक दाखवले .या निम्मीताने महिलांना सामाजिक आरोग्य विभागाने पॅम्फ्लेट देण्यात आले. या कार्यक्रमात महिलांनी स्वयंस्फूर्तिने सहभाग नोंदविला तसेच महिलांनी उखाणे घेऊन कार्यक्रमाला उत्सुफुर्त प्रतिसाद दिला.

डॉक्टर वहाडणे यांनी आरोग्य शिक्षणाचा देऊन, जनजागृती केली, आणि अमूल्य असा आरोग्याचा वाण आपल्या सर्वांना दिला असे प्राचार्य डॉ. प्रतिभा चांदेकर म्हणालया. यावेळी त्यांनी सर्वांचे उपस्थिती बद्दल आभार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील उप प्राचार्या व सामाजिक आरोग्य परिचर्या विभाग प्रमुख डॉ. योगिता औताडे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला. यासाठी त्यांना सौ. सलोमी तेलधुणे ,बाल आरोग्य विभाग व महिला सेल प्रमुख, सौ. कविता भोकनळ ,स्त्री रोग विभाग प्रमुख तसेच सहहायक प्राध्यापक सौ मोहिनी सोनवणे यांनी सहकार्य केले तसेच पुजा मोरे व सौ. आश्लेषा सुरासे यांनी सूत्र संचालन केले श्री. अमोल शेळके ,सौ रिबिका साळवे ,सौ सोनल बोरडे सौ. ऐश्वर्या पवार आणि श्री. प्रशांत अंबरीत ,यांचे मोलाचे सहकार्य मिळाले व प्रथम वर्ष एम एस्सी नर्सिंग व जीएनएम च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# शिक्षक संघाच्या अधिवेशनात होणार शिक्षकांच्या महत्वाच्या प्रश्नांची सोडवणूक

**पालकमंत्री राधाकृष्ण विखेंसह शिक्षणमंत्री लावणार उपस्थिती**

नगर : प्रतिनिधी

**दि.२४ फेब्रूवारी रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचा महामेळावा अहमदनगर येथे होणार असून या महामेळाव्यात शिक्षकांच्या महत्त्वाच्या प्रश्नाची सोडवणूक होणार असल्याची माहिती संघाचे राज्यसरचिटणीस आबासाहेब जगताप, प्रवीण ठुबे व सुदर्शन शिंदे यांनी दिली.**

जगताप यांनी सांगितले, या महामेळाव्यासाठी महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, राज्यनेते संभाजीतात्या थोरात, शिक्षक आमदार सत्यजित तांबे,बाळासाहेब झावरे उपस्थित राहणार आहेत. सध्या शिक्षकांनी मुख्यालयी राहण्याचा प्रश्न जिकरीचा झाला आहे. गावोगावी या एकाच प्रश्नावरून शिक्षकांवर रोष असलेले समाजघटक शिक्षकांना वेठीस धरत आहेत. शिक्षक संघ या प्रश्नाची कायमची वासलात लावण्यासाठी प्रयत्नशील आहे. जेष्ठ नेते रावसाहेब रोहकले व आपल्या प्रतिभेने राज्यातील शिक्षकांवर गारुड केलेले डॉ.संजय कळमकर यांच्या संघातील प्रवेशामुळे शिक्षक संघ कधी नव्हे एवढा बलदंड झाला आहे. याचा फायदा शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यासाठी होणार असल्याचेही जगताप यांनी सांगितले.




महामेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी घेण्यात आलेल्या बैठकीस शिक्षक नेते रावसाहेब सुंबे, भास्कर नरसाळे, संजय शेळके, बाळासाहेब सालके,संजय शिंदे, राम निकम, गणपत देठे, राजेंद्र ठाणगे,रघुनाथ झावरे, अमोल साळवे, बाळासाहेब रोहकले, नानासाहेब मोरे, मधुकर मैड, भाऊसाहेब नगरे, बाळासाहेब धाडगे, बाबा गोसावी, विजय लंके, बाळासाहेब देंडगे,आण्णा गुंजाळ आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ शिक्षक नेते रावसाहेब रोहोकले म्हणाले, शिक्षकांचे प्रश्न गांभीर्याने सोडवायचे असतील तर शिक्षकांची एकत्रित ताकद असणे गरजेचे आहे.काळाची पावले ओळखून आम्ही शिक्षक संघात प्रवेश केला आहे. शिक्षकांच्या जिल्हांर्गत बदल्या करण्यासाठी प्रभावीपणे पाठपुरावा करणात आहोत.

शिक्षकनेते डॉ.संजय कळमकर म्हणाले, अवांतर कामाने शिक्षक त्रासला आहे. महसूलपासून सर्वच खाते शिक्षकांचा मुक्त वापर करून घेत आहेत. त्याचा परिणाम अध्यापनावर होतो आहे. गुणवत्ता हवी असेल तर इतर कामे तात्काळ थांबवाली पाहिजेत. त्यासाठी सर्व शिक्षकांनी एक होणे गरजेचे आहे. शिक्षक संघाच्या झेंड्याखाली एकत्र येण्याचा उद्देश हाच आहे.

# आरोपींच्या मालमत्ता शोधून ठेवीदारांना पैसे द्या; सत्र न्यायालयाचे आदेश

नगर : प्रतिनिधी

**नगर अर्बन बँक घोटाळ्यात अनेक ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. त्यांचे ठेवी परत मिळणे गरजेचे आहे. दुसरीकडे आरोपी सापडत नाहीत. त्यामुळे सर्व आरोपींच्या मालमत्ता महसूल विभागाच्या मदतीने शोधून काढा. त्या जप्त करून लिलाव करा, यातून ठेवणाऱ्यांच्या ठेवी परत करा, असा आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. आर. सित्रे यांनी दिला.**

दरम्यान, अर्बन बँक घोटाळा प्रकरणी अटकेत असलेले अशोक कटारिया, मनेष साठे, अनिल कोठारी या तिघा माजी संचालकांना न्यायालयाने न्यायालयीन कोठडी पाठवण्याचा आदेश दिला.

**नगर अर्बन बँक घोटाळा**




पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्यांना आर्थिक गुन्हे शाखेने सोमवारी न्यायालयात हजर केले. यावेळी पोलिसांकडून तपासाची माहिती देण्यात आली.

सरकारी पक्षाच्या वतीनेअ‍ॅड.मंगेश दिवाणे, तर ठेवीदारांच्या वतीनेअ‍ॅड.अच्युतराव पिंगळे यांनी युक्तिवाद केला. न्यायालयाने सांगितले की,अर्बन बँक घोटाळ्यातील आरोपींच्या मालमत्ता शोधून लिलाव करण्यास वेळ लागत असल्यास आधी तीन ते चार मोठ्या प्रॉपर्टी जप्त करून त्यांचा लिलाव करा, यातून ठेवीदारांचे पैसे परत करून त्यांना न्याय देण्याबाबतही पोलिसांना सांगितले आहे.

(पान १ वरून)

### सावेडीत व्यापारी संकुलाला भीषण आग

नेत्रालयाला बसून त्यांचे बोर्ड जळाले. आगीने रौद्र रूप धारण केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण होऊन बघ्यांची मोठी गर्दी जमली. याबाबत मनपा अग्निशमन दलाला कळविण्यात आल्यानंतर बंब तातडीने दाखल झाला. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून ही आग आटोक्यात आणली. आग आजूबाजूला न पसरल्याने मोठा अनर्थ टळला. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. दरम्यान, आगीची माहिती समजताच आमदार संग्राम जगताप, माजी नगरसेवक संपत बारस्कर, रवींद्र वाकळे, अजिंक्य बोरकर, सचिन जगताप आदी घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांनी आग विझविण्यासाठी मोठी मदत केली.

### घोडनदी पात्रात वाळू तस्करांचा रात्रीस खेळ चाले !

अनेक दिवसांपासून वाळू, मुरूम, मातीची मोठया प्रमाणावर तस्करी होत असतना करूंद, कोहकडी हा भाग पारनेर व शिरूर तालुक्याच्या हद्दीवर येत असल्याने कारवाई नेमकी कोणी करायची या वादात दोन्ही तालुक्याचे अधिकारी उत्खननाकडे लक्ष देत नाही त्यामुळेच तस्करांचे फावते. अवैध उत्खनन करून पर्यावरणाचा -हास करणारांविरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**तहसीलदारांच्या भूमिकेकडे लक्ष**

कुरूंद व कोहकडी ही गावे पारनेर तालुक्याच्या हददीमध्ये येत असून वाळू तस्कर रात्रीच्या वेळी उत्खनन करून महसूल विभागास आव्हान देत आहेत. तहसिलदार गायत्री सैंदाणे या तस्करांवर कारवाई करणार का असा सवाल नागरीकांकडून करण्यात येत असून त्यांच्या भूमिकेकडे नागरीकांचे लक्ष आहे.

# 'कन्हैय्या'ला भेट देत विद्यार्थ्यांनी घेतले उद्योग, व्यवसायाचे धडे

## पारनेर पब्लिक स्कुलचा उपक्रम



■ पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी कन्हैय्या ॲग्रो उद्योग समुहास भेट देत स्वयंरोजगार, व्यापार, व्यवसाय व उद्योग अशा क्षेत्रात करीअर घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याचे धडे घेतले.

**गटेवाडी : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत पारनेर पब्लिल स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी गटेवाडी येथील कन्हैय्या ॲग्रो या उद्योग समुहास भेट देत स्वयंरोजगार, व्यापार, व्यवसाय व उद्योग अशा क्षेत्रात करीअर घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्याचे धडे घेतले.**

दहा एकर परिसरात विस्तरालेल्या कन्हैय्या ॲग्रो उद्योग समुहाची पाहणी करीत विद्यार्थ्यांनी हा उद्योग कशा पध्दतीने चालविला जातो याची सखोल माहीती घेतली. उद्योग समुहाचे कार्यकारी संचालक सुरेशशेठ पठारे यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ते म्हणाले. जिद्द, चिकाटी असेल तर ग्रामीण भागातील व्यक्ती देखील मोठा उद्योग समुह उभा करू शकते हे आम्ही कृतीतून सिध्द केले आहे. कन्हैय्या ॲग्रो उद्योग समुहामध्ये पशु पक्षांना लागणारे खाद्य,कच्चा मालावर प्रक्रिया करून पक्क्या मालाच्या स्वरूपात वेगवेगळया ऋतूनुसार पशुवैद्यकिय डॉक्टरांच्या मदतीने तयार केले जात असल्याचे पठारे यांनी सांगितले. त्याचे प्रात्यक्षिकही पठारे यांनी यावेळी दाखविले.

यावेळी बोलताना पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचे संस्थापक प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी सांगितले की, कन्हैय्या ॲग्रो उद्योग समुह हा पारनेर तालुक्यातील शेतकरी व जनतेचा आधारस्तंभ बनला आहे. दुग्ध व्यवसाय व पशु खाद्य निर्मितीसाठी कन्हैय्या ॲग्रोने नावलौकीक मिळविला आहे. या भेटीप्रसंगी गितराम म्हस्के यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक दिपक जाधव, अण्णासाहेब महानोर, महेंद्र रंधवे आदी उपस्थित होते.

### ३५० तरूणांना रोजगार

दहा एकर क्षेत्रातील कन्हैय्या ॲग्रो या उद्योग समुहात ३५० तरूणांना रोजगार मिळाला असून सुरेश पठारे व त्यांचे सहकारी संचालकांनी यशाची उत्तुंग भरारी घेत ग्रामीण तरूणांपुढे एक आदर्श ठेवला आहे.

**गिताराम म्हस्के**
प्राचार्य, पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स


### जिद्द, चिकाटी आणि व्यवस्थापन हवे

आम्ही सहकारी मित्रांनी एकत्र येत या उद्योगाची उभारणी केली. जिद्द, चिकाटी आणि अचूक व्यवस्थापनाच्या जोरावर या उद्योगात आम्ही अल्पावधीत यश संपादन केले. याच क्षेत्रात भविष्यात पुढचे पाऊल टाकण्याचा मानस असून अचूक व्यवस्थापनाच्या जोरावर त्यात आम्ही यश संपादन करू.

**सुरेश पठारे**
कार्यकारी संचालक
कन्हैया ॲग्रो, गटेवाडी, ता. पारनेर

# नाविन्याचा शोध घेऊन करियर करा

## सुरेश बोऱ्हुडे यांचे आवाहन



■ शासकीय रेखाकला परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे माजी सरपंच सुरेश बोऱ्हुडे यांच्या वतीने भेट वस्तू देत कौतुक करण्यात आले.

**नारायणगव्हाण : प्रतिनिधी**

**माहीती व तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षण क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांनी नाविन्याचा शोध घेऊन आपले करियर करण्याचे आवाहन नारायणगव्हाणचे माजी सरपंच, पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन तथा जातेगांव येथील श्री कालभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त सुरेश बोऱ्हुडे यांनी केले.**

नारायणगव्हाण येथील नारायण महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चित्रकला परिक्षेत विशेष प्राविण्यासह यश संपादन केले. हे यश संपादन करणाऱ्या पायल घावडे, समिक्षा गायकवाड, रोहन शेळके यांचा बोरूडे यांनी भेट वस्तू देत सत्कार केला. यावेळी बोऱ्हुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मेजर सतिश गाडीलकर हे उपास्थित होते.

यावेळी पुढे बोलताना बोऱ्हुडे म्हणाले, शिक्षण क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल होत असून व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांवर शासनाकडून भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी आपले करियर करताना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडावे. ध्येय निश्चित करून अभ्यासात सातत्य ठेवत परीश्रम केल्यास तुमचे यश दुर नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थीही मागे नाहीत हे तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांनी कृतीतून सिध्द केले असून त्यांचा आदर्श डोळयापुढे ठेऊन विद्यार्थ्यांनी आपली वाटचाल करण्याचे आवाहन बोऱ्हुडे यांनी केले.

यावेळी बोऱ्हुडे यांनी विद्यार्थ्यांना विविध भेट वस्तू देत विद्यार्थ्यांनी प्रत्येक वर्षी असेच यश संपादन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांनीही बोऱ्हुडे यांनी केलेल्या सन्मानाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत त्यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार आम्ही आमच्या आवडीचे क्षेत्र निवडून निश्चित यश संपादन करू व नारायणगव्हाणचे नाव उज्वल करू अशी ग्वाही दिली.

# शिक्षणामुळेच समाजाची प्रगती- आगरकर

## देवांग कोष्टी समाजाचे काम दीपस्तंभासारखे



**निघोज : प्रतिनिधी**

**उच्च शिक्षणाची कास धरल्यामुळेच आज देवांग कोष्टी समाजातील अनेक तरुण-तरुणींनी विकासाचे नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. अनेक समाज बांधवांचे काम दुसऱ्या समाजांसाठीही दीपस्तंभासारखे आहे . गेल्या ४० वर्षांपासून चालू असलेला हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी केले.**

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी शिक्षित तरुण-तरुणींना आपल्या ज्ञानाचा फायदा समाजातील वंचितांसाठी करण्याचा बहुमोल सल्ला दिला.

माहिती व तंत्रज्ञानाचा स्फोट झालेल्या आजच्या जगात विद्यार्थ्यांनी यशस्वितेसाठी सर्व समावेशक शिक्षण घेतले पाहिजे. दोन-तीन विषयांतील प्राविण्य ही आज काळाची गरज बनलेली आहे असे प्रतिपादन पुणे येथील एमआयटी कॉलेजचे प्राध्यापक संदीप शिरवले यांनी केले.

देवांग कोष्टी समाजसेवा मंडळ अंतर्गत विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठानतर्फे गुणवंत विद्यार्थी व समाजातील गुणवंतांचा सत्कार सोहळा नुकताच सावेडीतील श्री चौंडेश्वरी शैक्षणिक संकुलात पार पडला. यावेळी श्री चौंडेश्वरी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास अहमदनगर महापालिकेचे माजी महापौर बाबासाहेब वाकळे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष श्री अभय आगरकर, भाजपा युवा नेते करण कराळे उपस्थित होते.

या कार्यक्रमात नाशिक येथील वत्सलाबाई बेळे यांना कमलबाई लक्ष्मीकांत बिबवे जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे कम्प्युटर विज्ञान व तंत्रज्ञान सारख्या अवघड विषयात संशोधन करून पीएचडी मिळवल्याबद्दल डॉ. संकीर्ती शिरवले, डॉ. स्मिता थिटे व डॉ. संपदा थिगळे यांना गौरवण्यात आले.

या कार्यक्रमात समाजातील ज्या मातांना २०२३ या वर्षात कन्यारत्न प्राप्त झाले, त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गेल्या वर्षभरातील विविध क्षेत्रात नेत्रदीपक कार्य केलेल्या समाज बांधवांचा गौरव करण्यात आला. समाजातील गरजवंत विद्यार्थी व गरीब रुग्ण यांना मंडळातर्फे आर्थिक मदत करण्यात आली. या कार्यक्रमाकरिता सर्व क्षेत्रातील विद्यार्थी, त्यांचे पालक व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील समाजातील मान्यवर व सर्व देवस्थानचे अध्यक्ष व कार्यकर्ते उपस्थित होते.

विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठानचे प्रमुख कार्यवाह व मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता पोंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मंडळाचे प्रमुख विश्वस्त शैलेंद्र तरवडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व संचालक मंडळाने योगदान दिले.

# प्रा कवाद यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी

## ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे गौरोद्गार

**निघोज : प्रतिनिधी**

**शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून शिवव्याख्याते म्हणून शिवरायांचा इतिहास समाजापर्यंत नेण्याचे महत्वपूर्ण काम ते करीत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केले.**

स्वामी विवेकानंद ट्रस्ट, टिम आडवाटेचे पारनेर, साहित्य साधना परिषद, नागेश्वर मित्र मंडळ पारनेर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पद्मभूषण आण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक २०२४ या कार्यक्रमात उत्कृष्ट परिक्षक म्हणून प्रा.कवाद यांचा सन्मानचिन्ह देऊन हजारे यांच्या हस्ते सत्कार करुन सन्मानित करण्यात आले यावेळी हजारे बोलत होते. यावेळी प्रसिद्ध कवी सुहास पठाडे, शिक्षक बँकेचे संचालक व प्रसिद्ध कवी व साहित्यिक कारभारी बाबर, नागेश्वर मित्र मंडळाचे प्रमुख पदाधिकारी व पारनेर तालुका पत्रकार संघाचे सामाजिक उपक्रम विभागाचे अध्यक्ष विनोद गोळे, आडवाटेचे पारनेर प्रतिनिधी तुषार ठुबे, ग्रामपंचायत सदस्या सुधामती कवाद, निवृत्त शिक्षक हरिभाऊ चौधरी,




■ पारनेर येथील कार्यक्रमात शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद यांना ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

ॲड.शुभम गाडगे,अशोक महाराज शिंदे आदी उपस्थित होते.

हजारे यावेळी म्हणाले शिवव्याख्याते प्रा.कवाद यांनी शिवव्याख्याते म्हणून गेली वीस वर्षात छत्रपतींचा इतिहास सांगताना आजच्या युवकांनी छत्रपतींच्या कार्याचे अनुकरण करीत लोकाभिमुख समाजासाठी महत्वपूर्ण काम केले आहे. व्याख्याते,परिक्षक व शिक्षक ही त्यांची भुमिका त्रिवेणी संगमासारखी पवित्र आणी ज्ञानदायी तसेच निस्वार्थी ठरली असल्याने राज्यातील अनेक भागांमध्ये त्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वरील व्याख्यानासाठी बोलावणे होत असून एक प्रसिद्ध शिवव्याख्याते म्हणून त्यांचा नावलौकिक झाला असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले आहे.

# शरद पवारांची रुपेश ढवण यांनी घेतली भेट

## कांद्याच्या प्रश्नावर चर्चा

**निघोज : प्रतिनिधी**



**राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची युवा नेते रुपेश ढवण यांनी पुणे येथे सदिच्छा भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. ढवण यांच्यासमवेत यावेळी त्यांचे चिरंजीव राजवीर, अक्षय भाकरे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.**

ढवण यावेळी म्हणाले पवार साहेब पुण्यात येणार आहेत तुम्हाला त्यांना भेटता येईल असा निरोप राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कार्यालयाकडून शुक्रवार दि.२ रोजी आला. शनिवार दि. ३ रोजी पुणे येथील मोतीबाग येथे पवार साहेब हे जवळपास पंधरा मिनिटे भेटले यावेळी त्यांच्या बरोबर विविध विषयांवर चर्चा करण्याची संधी मला मिळाली विशेष करून आज बाजारपेठत कांदा दहा ते बारा रुपये किलोने विकला जात आहे एकीकडे पाकिस्तान सारख्या शेजारच्या देशातील शेतकरी कांदा युरोप राष्ट्रात पाठवीत असून ते श्रीमंत झाले असून आपल्याकडे मात्र सरकारने निर्यात बंदी सारखे अस्त्र बाहेर काढून शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे यावर पवार साहेब यांनी याबाबत केंद्र सरकारला जाब विचारणार असल्याचे सांगितले.

आमदार रोहित पवार यांच्या सारख्या कार्यक्षम युवकाला सरकार ई डी मार्फत त्रास देत असून याचाही जाब विचारण्याची गरज निर्माण झाली असल्याचे पवार साहेब यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. अशाप्रकारे पंधरा मिनिटांच्या भेटीत अनेक विषयांवर चर्चा करण्याची संधी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला मिळाली हे माझे परमभाग्य समजतो तसेच पवार साहेब यांनी माझा चिरंजीव राजवीर याची आस्थेने चौकशी करून त्याला सेकहँड केला अशाप्रकारे काम करीत राहा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नावर युवकांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन पवार साहेब यांनी यावेळी केले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे निरीक्षक अंकुश काकडे यांचीही भेट घेतल्याचे ढवण यांनी सांगितले.

# परिस स्पर्श योजनेसाठी डॉ. आहेर यांची निवड

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**राज्यातील नॅक व एनबीए मुल्यांकन न झालेली महाविद्यालये व परिसंस्थांचे नॅक व एनबीए मुल्यांकन करून घेण्याच्या दृष्टीने महाराष्ट शासनाने परिस स्पर्श योजना सुरू करण्यात आली आहे. परीस स्पर्श योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने विद्यापीठ व जिल्हा स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचे कुलकुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर कॉलेजचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांचे जिल्हास्तरीय अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन केले आहे.**



पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षचे संचालक डॉ. संजय ढोले यांच्याकडून डॉ. रंगनाथ आहेर यांना सदर नेमणूक आदेश पाठविण्यात आला आहे. अहमदनगर जिल्हा विद्या प्रसारक समाज संस्थचे पारनेर येथील न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज या महाविद्यालयाने देशात आणि राज्या मिळविलेले सर्वप्रथम यश, राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, उत्कृष्ठ शैक्षणिक कामगिरी याची दखल घेउन डॉ. आहेर यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. आहेर यांच्या नियुक्तीबद्दल अहमदनगर जिल्हा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, प्राध्यापक व शिक्षणप्रेमींनी डॉ. आहेर यांचे अभिनंदन केले आहे.टाकळी ढोकेश्वर परिवाराच्या वतीनेही डॉ. आहेर यांचे अभिनंदन करण्यात आले.

# सबज्युनिअर स्पर्धेतून भविष्यातील खेळाडू घडतील

## ■ अभय आगरकर यांचे प्रतिपादन ■ माधव साबळे यांना जिल्हास्तरीय गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार

**सुपा : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा क्रीडा क्षेत्रात भरीव प्रगती करत असून सबज्युनिअर स्पर्धेतून भविष्यातील खेळाडू घडतील असे प्रतिपादन भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांनी केले.**

वाडीया पार्क क्रीडा संकुल येथे अहमदनगर जिल्हा ॲथलेटीक्स असोशिएशन आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष स्थानावरुन ते बोलत होते. लहान वयात खेळाची आवड निर्माण होणे अत्यावश्यक बनले आहे त्यासाठी अशा क्रीडा स्पर्धा गरजेच्या आहेत असेही ते म्हणाले.

प्रमुख पाहुणे म्हणून हॉकीचे राष्ट्रीय खेळाडू उपजिल्हाधिकारी गणेश राठोड उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की खेळात प्रशिक्षक हे अत्यंत महत्त्वाचे असून योग्य वेळी योग्य दिशा प्राप्त केल्याने खेळात नैपुण्य प्राप्त करता येते व लहान वयासाठी असणाऱ्या सब ज्युनिअर स्पर्धा नक्कीच भविष्यातील मिल्खा सिंग, कविता राऊत यासारखे सर्वोत्तम खेळाडू घडतील.




(छाया – शरद रसाळ, सुपा)

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे यांनी भविष्यातील उपलब्ध होणाऱ्या क्रीडा सुविधांबाबत माहिती देताना सिंथेटीक ट्रॅकचे स्वप्न लवकरच पूर्णत्वास जाईल याची ग्वाही दिली.
यावेळी छत्रपती पुरस्कार विजेते सुनील जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी अनेक राष्ट्रीय खेळाडू घडविणारे माधव साबळे यांना जिल्हास्तरीय गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार तर राष्ट्रीय पदकविजेती खेळाडू साक्षी भंडारी हिला जिल्हास्तरीय गुणवंत खेळाडू पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

यावेळी राज्य मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरंगे, भाऊराव वीर, सचिव दिनेश भालेराव, व्हॉलीबॉल राज्य संघटनेचे उपाध्यक्ष शैलेश गवळी, महाराष्ट्र राज्य सायकलिंग असोसिएशनचे सचिव संजय साठे, कल्पेश भागवत, महेंद्र हिंगे शिक्षक सोसायटी चे संचालक व विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच रोटरी क्लब ऑफ डिग्निटीचे अध्यक्ष प्रसन्ना देवचक्के, सचिव उज्वला राजे, अभय राजे, अनिल बिहानी, शशी बिहानी, डॉ. प्रदीप चोभे, डॉ. अजिता चोभे, डॉ.अमृता देवचक्के, हर्षद मुळे, श्वेता मुळे उपस्थित होते. ६ , ८ , १० , १२ व १४ वर्षे तसेच ३५ ते ७० वयोगटातील जेष्ठ खेळाडूंनी मोठया उत्साहात स्पर्धेत सहभाग घेतला.

पंच म्हणून संदीप घावटे, राहुल काळे, श्रीरामसेतू आवारी, जगन गवादे, रावसाहेब मोरकर, सुयोग शेळके, अमित चौहान, गुलजार शेख, नेहा मोरे, अनिकेत कोळगे यांनी काम केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजेंद्र कोतकर यांनी केले तर आभार क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com